# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. २८/०२/२००७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक २८/०२/२००७ रोजी सभा सुचना क्र. ३० दि. २१/०२/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ५) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ६) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ७) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ८) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ९) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १०) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ११) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| १२) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| १३) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| १४) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| १५) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १६) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

**मा. सभापती सो. :-**

सभेला सुरूवात करा.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १९८ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

वृक्षप्राधिकरण पान नं. ४३, वृक्षप्राधिकरणाचे बजेट १ कोटी ३५ रू. आहेत.

**शरद बेलवटे :-**

तो १ कोटी ४४ रू. करा.

**रतन पाटील :-**

१ कोटी ४४ रू. आहे का?

**शरद बेलवटे :-**

होय. १ कोटी ४४ रू. आहे. ह्याच्यामुळे, आता खाली ९१ येतील. पान क्र. ४३ वृक्षकरापासूनचे जे १३५ उत्पन्न दाखवले आहे. ते मा. स्थायी समितीच्या अंदाजपत्रकात १४४ आहे. १४४ मुळे खाली महानगरपालिकेच्या उत्पन्नातील जी सबसिडी आहे वृक्षप्राधिकरणातील रक्कम वर्ग. ती १ लाख रु. नी कमी होईल. ती ९१ लाख रु. होईल.

**रोहिदास पाटील :-**

पैसे वाढवायचे आहे कीकमी करायचे आहे?

**गणेश पाटील (वन अधिकारी) :-**

वाढवायचे आहे.

**मा. सभापती :-**

पैसे कुठे वाडवायचे आहे?

**गणेश पाटील (वन अधिकारी) :-**

उद्यान व विकास.

**रतन पाटील :-**

तुमचा हेड कुठे आहे? काल तुम्हाला दिले आहे.

**रोहिदास पाटील :-**

खर्च कुठे आहे?

**गीता जैन :-**

आपल्याकडे उद्‌यान व विकासाचा हेड आला आहे.

**मा. सभापती :-**

१ काटी ४४ लाख रु. केले आहेत ना.

**एस. ए. खान :-**

श्री. गणेश पाटील साहेब, तुमचा हेड कुठे आहे?

**दिपक खांबित :-**

तो बांधकाम विभागाने घेतला आहे.

**शरद बेलवटे :-**

सार्वजनिक बांधकाम आणि वृक्षप्राधिकरण उद्यान व विकास ५० दिले आहे.

**रोहिदास पाटील :-**

उद्यान व विकास तर करावे लागेल ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ते करतील.

**शशिकांत भोईर :-**

खेळणी बसवण्यासाठी त्यांना उद्यान व विकास घ्यायला लागेल. बांधकाम घेतो ते कंपाउंड वॉल बांधण्यासाठी..........

**गीता जैन :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर कल खेळणी भी था।

**दिपक खांबित :-**

पान क्र. २८ वर खेळणी, इलेक्ट्रीफिटींग.........

**शरद बेलवटे :-**

पान क्र. २८ सार्वजनिक उद्याने, खेळणी

**हंसुकुमार पांडे :-**

आपको २५ लाख रु. दिये है ना।

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही १ कोटी रुपये दिले आहे.

**शशिकांत भोईर :-**

खेळणी व इलेक्ट्रीफिटींग किती दिले आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

२५ लाख रु.

**रोहिदास पाटील :-**

उद्यान विकासासाठी किती दिले आहे?

**शरद बेलवटे :-**

उद्यान विकासासाठी नविन बांधकामा सांगितले आहे.

**रतन पाटील :-**

एकच दिले आहे. ७५ लाख रु.

**शरद बेलवटे :-**

कारण तुम्ही उद्यान व विकासाचा नविन बांधकाम करणार आहात.

**दिपक खांबित :-**

उद्यान व विकास वृक्षप्राधिकरण विभागाकडे गेले आहे ना.

**शरद बेलवटे :-**

उद्यान व विकास निधी नविन विकसित करणे. म्हणजे तेच झाले ना.

**दिपक खांबित :-**

उद्यान व विकास कसे म्हणजे आम्ही बांधकाम.........

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांना लाल माती, शेणखत लागते. त्याच्यात ते आहे ना.

**एस. ए. खान :-**

मैदाने विकास घ्या. शाळेसाठी मैदान पाहिजे ना. लोकवस्ती वाढत चालली आहे. १ कोटी रु. पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, हे क्रमांक ७ आपण स्टेडीयमसाठी ठेवलेले आहे. आरक्षण क्र. ९१.

**दिपक खांबित :-**

मैदाने विकास ५० लाख रु. ठेवले आहे.

**एस. ए. खान :-**

मैदान विकासामध्ये ठेवा.

**रतन पाटील :-**

मैदान विकासासाठी पाहिजे की नाही?

**एस. ए. खान :-**

मैदाने विकास पाहिजे ना.

**शशिकांत भोईर :-**

क्रमांक १५ वर कुठला विभाग? पान नंबर किती?

**मा. सभापती :-**

पान २९ वर क्र. १५ मैदान विकास.

**दिपक खांबित :-**

मैदाने विकास आहे ना ते पान ३० वर क्र. ७ वर जे स्टेडीयम क्रिडा संकुल आहे.

**शशिकांत भोईर :-**

मैदाने विकासासाठी १ लाख रु. चे पाहिजे का? आपल्याकडै किती मैदान विकास आहेत? ते विकसितच करायचे नाही का? कालच रु. ५० लाख त्यांनी घेतले आहेत.

**एस. ए. खान :-**

कुठे कमी करायला सांगितले आहे?

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, मी सांगतो तुम्ही ऐकून घ्या. एकच हेड खर्च करा इतर कामासाठी पैसे पाहिजेत.

**नगरसचिव :-**

पान क्र. २९ अनुक्रमांक १५ मैदाने विकास हा कट करुन पान क्र. ३० वर अनु. क्र. ७ स्टेडीयम क्रिडा संपूर्ण आरक्षण क्र. ९१ कट करायचा. त्याऐवजी तिकडे मैदाने विकास हा शब्द घ्यायचा आणि त्याची जी रक्कम आहे ५० लाख रु. ती रक्कम रु. ७५ लाख करायची आहे.

**एस. ए. खान :-**

मिरारोडला आपली ४ मैदाने आहेत.

**रतन पाटील :-**

मैदाने आणि उद्याने विकास असे घ्यायला पाहिजे

**नगरसचिव :-**

स्टेडीयम क्रिडा संपूर्ण मैदाने विकास ५० लाख रु. ऐवजी ७५ लाख रु. करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कोणाची आहे?

**एस. ए. खान :-**

आपले मिरारोडचे चार मैदाने आहेत.

**जयंत पाटील :-**

मिरारोड मे ........

**रोहिदास पाटील :-**

पहला प्रोव्हिजन तो करो।

**दिपक खांबित :-**

पान क्र. २९ आहे ना ........

**एस. ए. खान :-**

मिरारोडमे आएगा तो मिरारोड से टॅक्स कम वसुल करना चाहिए।

**नगरसचिव :-**

पान क्र. २९ ...........

**मा. सभापती :-**

हा विषय काल झालेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

श्री. बेलवटे साहेब, तुम्ही वृक्षप्राधिकरण बांधकामामध्ये इन्क्लूड करा.

**रतन पाटील :-**

दोन्ही आतमध्ये जाउन ठरवून या.

**दिपक खांबित :-**

बगीच्यामध्ये जे बोर्ड लावता............

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्याला बोर्ड कशाला लावायची गरज आहे? बोर्ड लावले की दुसऱ्या दिवशी कोणीही घेउन जातात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कशाला? काही गरज नाही. तुम्ही फक्त लालमाती आणा, शेणखत आणा.

**शशिकांत भोईर :-**

ट्रिगार्ड आणा.

**मा. सभापती सो. :-**

५ लाख रू. करून टाका.

**शरद बेलवटे :-**

साहेब, पान क्र. २८ घ्या. नगर भूविकास खर्च १ कोटी २० लाख रू. घेउन तुम्ही वृक्षारोपण कुठे करणार आहे?

**शरद बेलवटे :-**

.तुम्ही झाडे लावणार नाही का?

**गणेश पाटील :-**

लावणार.

**शरद बेलवटे :-**

आणि मग.

**गणेश पाटील :-**

स्मशानचा हा हेड वेगळा आहे.

**शरद बेलवटे :-**

बांधकामाचा हेड...................

**गणेश पाटील :-**

झाडाच्या हेडमधून पैसे कमी करू नका?

**गणेश पाटील :-**

नाही वापरणार.

**दिपक खांबित :-**

तुम्हाला पाच लाख रू. दिले आहेत. तुम्हाला इकडे कीती पाहिजे आहेत?

**गणेश पाटील :-**

दहा लाख रूपये पाच लाख रूपये वाढवायचे आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. गणेश पाटील साहेब, ठिक आहे तुम्हाला ५ लाख रूपये वाढवून दिले आहे.

**शरद बेलवटे :-**

१ कोटी २० लाख मधून इकडे ५ लाख रू. द्यायचे का?

**जयंत पाटील :-**

कशामधून?

**शरद बेलवटे :-**

वृक्षप्राधिकरणाचे १२० मधून इकडे ५ लाख रूपये द्यायचे का?

**जयंत पाटील :-**

होय.

**शशिकांत भोईर :-**

तुमच्या वृक्षप्राधिकरणातून ५ लाख रू. कमी होतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. पाटील साहेब, मा. सभापती साहेब, वृक्षरोपणामध्ये १ करोड २० लाख रू. आहेत. साहेब, १ करोड २० लाख रू. म्हणजे किती झाले?

**रोहिदास पाटील :-**

आणि झाडे कूठे जगतात?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब हा अवास्तव खर्च करू नका. ह्यामध्ये कमी करा. १ कोटी मधून कमी करा.

**रतन पाटील :-**

साहेब, ५० लाख रू. कमी करा.

**गणेश पाटील :-**

१ कोटी २० लाख रु. खरी गोष्ट आहे. मी त्याची डिटेल सांगतो. संपूर्ण क्षेत्रात वृक्षारोपण केले असुन त्यासाठी २९.५० झालेले आहे. सगळ्यात जास्त झालेले आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

२९.५ एवढे झाडे तुम्ही लावली असे सांगता. पण, ती जगली नाहीत.

**मा. सभापती :-**

ते जगलेल्या झाडांची संख्या सांगतात.

**रतन पाटील :-**

श्री. गणेश पाटील साहेब, केबिन रोडला सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी अगोदर झाडे लावलेली होती. ती झाडे कुठे गेली? आपण एका झाडाला रू. १२०० दिले आहे?

**शशिकांत भोईर :-**

श्री. गणेश पाटील, पान क्र. ४४ वरून, तुमच्या वृक्षप्राधिकरणाचे जे आहे तुम्ही त्यामधून खर्चाची बाजू घ्या. तुम्ही वाकडे तिकडे जावू नका.

**एस. ए. खान :-**

पेंडींग बिल किती आहे?

**हंसुकुमार पांडे :-**

पेंडींग बिल किती आहे? सन २००६-०७ झाली आपण ह्यांना १५ लाख रू. दिले आहे. त्याच्यातले आपण ३ लाख ९१ हजार रू. खर्च केलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, सचिव साहेबांना त्यांचे निवेदन काढायला सांगा.

**मा. सभापती :-**

नगरसचिव साहेब, स्पष्टीकरण द्या.

**शशिकांत भोईर :-**

२० लाख रू. आहेत. तर त्यांना विचारा की, किती पाहिजे?

**नगरसचिव :-**

३ लाख रू. आहेत आणि वृक्षरोपण १ कोटी २० लाख रू. आहेत. वृक्ष गणना १५ लाख रू.

**गिता जैन :-**

वृक्षगणना काहीच नाही.

**एस. ए. खान :-**

निल आहे.

**नगरसचिव :-**

मजूर पुरवठा १५ लाख रू., ट्रीगार्ड.........

**मा. सभापती :-**

मजूर पुरवठा कमी करायचे आहेत ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नगरसचिव साहेब, स्थायी आस्थापनाचे जे ७ लाख रू. ठेवले आहेत. अजूनपर्यंत चार वर्षामध्ये १ रू. सुद्धा खर्च झालेला नाही आणि एक्स्टेपेशन सुद्धा नाही. मग ७ लाख रू. ठेवायची गरज काय?

**गणेश पाटील :-**

तो खर्च आमच्याकडे दिसला असेल परंतु, तो खर्च आमच्याकडून होत नाही. तो खर्च अस्थापनेकडून होतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

असे कसे खर्च होतो.

**दिपक खांबित :-**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब खर्च झालाच नाही.

**शशिकांत भोईर :-**

खर्च झालाच नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

५ लाख रू. कमी करा. फक्त २ लाख रू. ठेवा.

**नगरसचिव :-**

टोकन ठेवायला पाहिजे.

**मा. सभापती सो. :-**

१ लाख रू. ठेवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, माती व शेणखत त्याच्यामध्ये २० लाख रू. ठेवले आहे. सन २००३-२००४ ला काहीच खर्च झालेला नाही. सन २००४-२००५ ला सुद्धा खर्च झाला नाही. सन २००५-२००६ ला १ लाख ७३ हजार रू. खर्च झाला आणि आणखी ११ लाख रू. पेंडींग आहे. म्हणजे, १५ लाख रू. सुद्धा खर्च झालेला नाही. मग ह्यावर्षी २० लाख रू. ठेवायची गरज नाही. फक्त १५ लाख रू. ठेवा.

**हंसुकुमार पांडे :-**

मी तेच बोललो.

**मा. सभापती सो. :-**

माती, शेणखत २० लाख रू. च्या जागी १५ लाख रू. करायचे आणि वरती १ लाख रू. टोकन म्हणून ठेवायचे नं. २ मध्ये १५ लाख रू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नं. ३ मध्ये किटकनाशके त्यासाठी ३ लाख रू. ठेवले आहे. सन २००३ ला खर्च झालेला नाही. सन २००४-२००५ ला सुद्धा खर्च झाला नाही. फक्त सन २००५-०६ ला रू. १ लाख एवढा खर्च झालेला आहे आणि या वर्षात काहीच खर्च झालेला नाही. तर ३ लाख रू. ठेवले आहे तिथे १ लाख रू. ठेवा.

**मा. सभापती सो. :-**

तिथे १ लाख रू. ठेवा.

**रोहिदास पाटील :-**

एवढे लक्षात घ्या की, तुम्ही वृक्षप्राधिकरण कधीपासून चालू केले? एकदा त्या समितीला अधिकार दिले तर त्यांचे क्षेत्र वाढणार, त्यांच्याकडून अपेक्षा वाढणार मग ती कामे कशी करतील?

**जयंत पाटील :-**

वृक्षप्राधिकरण जुने आहे?

**शशिकांत भोईर :-**

समिती आता स्थापन झाली.

**गिता जैन :-**

वृक्षप्राधिकरणाला चार वर्षे झाली.

**रोहिदास पाटील :-**

मी तेच सांगतो की, चार वर्षे झाली त्याप्रमाणे त्यांची रकमा वाढत चालली आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

तुमची नर्सरी आता तशीच पडून आहे.

**रतन पाटील :-**

नर्सरी आता स्वतः चालू केलेली आहे. आपण महापालिकेच्या वतीने नर्सरी चालू केलेली आहे आणि सुंदर नर्सरी आहे.

**जेन्वी आल्मेडा :-**

नविन अधिकारी झालेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

वृक्षारोपण १ कोटी २० लाख रू. आपण जर अंदाज बघितला तर, ९० लाख रू. १ कोटी रू. च्या आसपास खर्च होतो, तिथे आम्ही १ कोटी २० लाख रू. ठेवतो.

**मा. सभापती :-**

१ कोटी २० लाख रू. ठेवा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मजुर पुरवठ्यामागे गेल्या चार वर्षाचा अनुभव पाहता, फक्त ६ लाख ९७ हजार रू. एका वर्षात खर्च झालेला आहे आणि गेल्या वर्षी काहीच खर्च झालेला नाही. इथे १५ लाख रू. ठेवले आहे तर इथे आपण ५ लाख रू. ठेवू या.

**गणेश पाटील :-**

आपण मजूर पुरवठा २० लाख रू. करतो.

**गिता जैन :-**

तुम्ही खर्चच केलेला नाही.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही जो खर्च केलेला आहे तो दाखवत नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

आठ महिन्यात आठ लाख रू. खर्च केलेला आहे.

**गणेश पाटील :-**

सन २००६ ला

**नगरसचिव :-**

श्री. बेलवटे इथे चुकीचे आहे.

**मा. सभापती सो. :-**

चुकीचे आहे.

**नगरसचिव :-**

मजूर पुरवठा आठ महिन्यात आठ लाख रू. आहे. चार महिन्यात परत आठ लाख रू. लिहिलेले आहे. यांची बेरीज २० होत नाही.

**गणेश पाटील :-**

१२ लाख रू. खर्च झालेला आहे.

**नगरसचिव :-**

काहीतरी खर्च झालेला असेल ह्यांची बेरीज २० होत नाही.

**शरद बेलवटे :-**

बेरीज होते ना.

**नगरसचिव :-**

कशी काय? आठ आणि आठ सोळा मग विस कशी काय होते?

**शरद बेलवटे :-**

आठ आणि आठ ते वृक्षप्राधिकरणाचे अंदाज आहे.

**नगरसचिव :-**

८ लाख रू. खर्च झाला नाही. लक्षात आले.

**शरद बेलवटे :-**

मग तुमची बिले का येत नाहीत?

**शशिकांत भोईर :-**

तुमचे अकाउन्ट कोण बघतो?

**गणेश पाटील :-**

इथे माझे अकाउन्ट आहे.

**मा. सभापती सो. :-**

मजूर पुरवठा १५ लाख राहू द्या. कमी करू नका.

**नगरसचिव :-**

ट्री गार्ड दुरूस्ती २ लाख रू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, वृक्षारोपणमध्ये ट्रिगार्ड खरेदीसुद्धा असते लाल माती शेणखत झाडे सुद्धा असतात ना. मग १५ लाख रू. एक्सट्रा करायची गरज नाही.

**जयंत पाटील :-**

१ कोटी २० लाख रू. झाडासाठी लागत नाही. त्यांच्यात ट्रिगार्ड पकडूनच येते.

**गणेश पाटील :-**

ट्रीगार्ड सोडून.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. गणेश पाटील साहेब, ऐकून घ्या काहीतरी तुमचे तरी चुकतय किंवा आमचेतरी चुकतय सन २००३-०४-०५ ला काहीच खर्च नाही.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही खुलासा करा तुमचा जो कोणी अकाउन्ट असेल त्याच्यामध्ये खर्च दाखवलाच नाही. तुमचा हा खर्च चुकीचा आहे. एकतर खर्च झालेला असेल आणि तुम्ही जमेची बाजूला प्लस दाखवला असेल की आम्ही खर्च केलाच नाही. असे दाखवले असेल. इथे कुठेतरी तुमची गफलत होते. मला वाटते की तुमच्या वृक्षप्राधिकरणाचे मुख्य दर जो कोणी तपासणारा असेल त्याला घेवून या, नंतर आपण तुमचे बजेट पास करायला लागेल.

**गणेश पाटील :-**

इकडे बजेट तपासणारा कोण आहे का?

**शशिकांत भोईर :-**

मग तुम्ही दिलेला अंदाज बरोबर आहे का? ह्यांना देउच नये, असे मी सांगेन.

**गणेश पाटील :-**

सन २००२-०३-०४ मध्ये खर्च दाखवला नसेल. कारण त्यावेळेला ती झाडे ठेकेदाराने लावलेली होती आणि त्याने पिंजऱ्यासकट लावलेली होती. हे तुम्ही लक्षात ठेवा आणि आता झाडे लावताना आपण आता ट्रीगार्ड बसवतो.

**शशिकांत भोईर :-**

ते पिंजरे कुठे गेले? ज्या ठेकेदाराने तीन वर्षे झाडे लावली, ट्रीगार्ड लावले, मग ते पिंजरे, ट्रीगार्ड कुठे गेले?

**गणेश पाटील :-**

आता आपले बजेट दाखवता येईल नविन झाडे लावून त्याठिकाणी ट्रिगार्ड लावायचे आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुमचे बरोबर आहे. पण तुम्ही महानगरपालिकेने दिलेली गाडी घेवून फिरलात तर तुम्हला ट्रीगार्ड फुकटमध्ये मिळणार. कारण जी झाडे मोठी झाली आहेत तिथे ट्रीगार्ड नुसते सडत पडलेले आहेत. तुम्ही ते ट्रिगार्ड कापून नविन ट्रिगार्ड दुरूस्त केले पाहिजे. साहेब, तुम्हाला नवीन ट्रिगार्ड खरेदी करायची गरज नाही. मी तुम्हाला दाखवतो. आमच्या एरियामध्ये मी तुम्हाला कमीत कमी ५० ट्रीगार्ड असेच देतो. ते कापा आणि ते लगेच ट्रिगार्ड जॉइन्ट करा आणि लगेच नविन ट्रीगार्ड वापरा. तेथे असेच ट्रीगार्ड पडलेले आहे. लगेच तुम्ही संपूर्ण मिरा भाईंदर मध्ये फिरा तुम्हाला जवळजवळ १०० ट्रीगार्ड भेटतील.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब ३००० झाडे लावली.

**गिता जैन :-**

श्री. गणेश पाटील साहेब मी एक विचारू का? तुम्ही वृक्षारोपणामध्ये १ कोटी २० लाख रू. हा खर्च फक्त वृक्षाचा खर्चच म्हणून पकडतात का? मग १ कोटी २० लाख रू. जर वृक्षासाठी खर्च येणार तर ट्रिगार्ड साठी फक्त १५ लाख रू. पुरेल का? ट्रिगार्ड महाग असते की वृक्ष महाग असते? तेवढे सांगा.

**गणेश पाटील :-**

ट्रीगार्ड महाग असते.

**गिता जैन :-**

मग १ कोटी २० लाख रु. चे वृक्ष आणि १५ लाख रू. चे ट्रीगार्ड?

**गणेश पाटील :-**

वृक्षारोपणामध्ये जे १ कोटी २० लाख रू. दाखवतात ती फक्त झाडे इस्टिमेट करतो. नविन झाडे लावायची नाही. त्यासाठी आपण कुठला तरी बगीचा घेतलेला आहे. त्याच हेडखाली ते येते आणि एखादा डिवायडर गार्डन बनवत असेल तर ते सुद्धा त्याच हेडखाली येते. तर ते हेड एक आहे. आणि आपल्याला त्या हेडखाली भरपूर काही बनवायचे आहे. आपल्याला फक्त झाडेच खरेदी करायची नाहीत.

**शरद बेलवटे :-**

फक्त रस्त्याकडेची झाडे नाहीत.

**गणेश पाटील :-**

फक्त रस्त्याकडेची झाडे नाहीत.

**रतन पाटील :-**

तुम्ही हे क्लिअरेशन करायला पाहिजे. आम्हाला समजणार का?

**गणेश पाटील :-**

पण मी सांगतोय ना.

**रतन पाटील :-**

आता बोललात तेव्हा सांगितले.

**मा. सभापती सो. :-**

साहेबांनी आता स्पष्टीकरण दिले ना.

**शशिकांत भोईर :-**

ट्रिगार्ड १५ लाख रू.

**रोहिदास पाटील :-**

पुढचे घ्या.

**नगरसचिव :-**

वाहन खरेदी.

**शशिकांत भोईर :-**

तुम्हाला कोणते वाहन खरेदी करायला लागते ते बोला. तुमच्याकडे आता दोन-तीन वाहने आहेत असे मला वाटते.

**गणेश पाटील :-**

एक ट्रॅक्टर आहे आणि एक जिप आहे. आपण एक भाड्याचा ट्रॅक्टर घेतलेला आहे. आता आपल्याला एक ट्रॅक्टर घ्यायचा आहे. आणि जिप घ्यायची आहे.

**गणेश पाटील :-**

आठ लाख रूपये बरोबर आहे.

**मा. सभापती सो. :-**

पुढचे घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

फळे, फुले, ग्रीन हाउस बांधणे म्हणजे काय?

**गणेश पाटील :-**

ग्रीनहाउस म्हणजे छत्र्याटाईप होय ते भाईंदर (प.) ला धक्क्यावरती बनवलेले आहे. आता आपल्याला तसेच ग्रीन हाउस साठ फुटीला बनवायचे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ग्रीन हाउस बांधल्याने काय फायदा होईल. साहेब, तुम्ही जे ग्रीनहाउस बांधले आहे ना. ते ग्रीनहाउस कुठे माहित आहे का? ते ग्रीनहाउस झाडावरती आहे. बाकड्यावरती ग्रीन हाउस बांधले गेलेले नाही. तुम्ही जी छोटी छोटी झाडे लावलेली आहेत समजा एखादे मोठे झाड लावले आहे. त्याच्याभोवती एक गोल कंपाउन्ड बांधलेले आहे.

**गणेश पाटील :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांचे म्हणणे बरोबर आहे. ज्या छोट्या छोट्या झाडांचे वृक्षारोपण केलेले आहे. त्याच्यावर ग्रीन आच्छादन बनवलेले आहे. ते सुदामानगर मध्ये आहे. त्यानंतर धक्क्यावरती बनवलेले आहे. ते मोठ्या झाडांसाठी त्यावर ग्रीनहाउस बांधलेले आहे. त्याच्याखाली रोपे असतात. आणि त्या रोपांवर काही पडू नये म्हणून त्यांचा उपयोग होतो.

**मा. सभापती सो. :-**

तुमची काय विनंती आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपण नविन पद्धतीने काय केले आहे की, एक नाला हाता त्या नाल्यावर स्लॅप टाकून त्याच्यावर पदचारी मार्ग आणि त्याच्यासाईडला कुंपण बनवून तिथे झाडे लवली तद्नंतर माझ्या नगरसेवक निधीतून इलेक्ट्रोफायटींग करून सुशोभिकरणाचे दिवेसुद्धा लावले. त्यानंतर त्याला असेच गार्डनचे स्वरूप आले. तर त्यावर ज्यांना ग्रीनहाउस बनवायचे आहे. त्या पद्धतीने बनवायचे असेल तर त्यासाठी खर्च लागेल. आम्हाला त्याचा खर्च पाहिजे वाढवायचे आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्यासाठी पैसे दिलेले आहे.

**मा. सभापती सो. :-**

वाढवायचे आहे तर तसे सांगा की, वाढवून द्या.

**शशिकांत भोईर :-**

५ लाख रू. वाढवून द्या.

**मा. सभापती सो. :-**

२० लाख रू. चे २५ लाख रू. करा.

**गिता जैन :-**

यह ग्रीनहाउस २० लाख रू मे हो जायेगा।

**शशिकांत भोईर :-**

त्यावर आपण ते मध्ये मध्ये बांधायचे आहे.

**दिपक खांबित :-**

काँक्रेटचे का?

**शशिकांत भोईर :-**

काँक्रेटचे नाही.

**जेन्वी आल्मेडा :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब, तुमची आणखी नगरसेवकनिधी येईल ना?

**मा. सभापती सो. :-**

२० लाख रू. चे २५ लाख रू. करा.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, ह्याच्यामध्ये किती घेतले आहे?

**रोहिदास पाटील :-**

पाच लाख रू. वाढवून दिले.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, ५ लाख रू. ने होणार नाही. १० लाख रू. वाढवून पाहिजे.

**मा. सभापती सो. :-**

पाच लाख रू. बस झाले.

**शशिकांत भोईर :-**

तिकडचा एरिया १२५ मिटरपेक्षा जास्त आहे.

**गिता जैन :-**

तुम्हाला या २० लाख रू. मधून ग्रीन हाउस कुठे बांधायचे आहे?

**गणेश पाटील :-**

आता फक्त तुमचा......

**शशिकांत भोईर :-**

माझा २० लाख रू. चा प्रस्ताव राहिला आहे.

**गिता जैन :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर एक मिनिट थांबा. श्री. गणेश पाटील साहेब, अजुनपर्यंत तुमच्याकडे काही सुचना नाहीत.

**गणेश पाटील :-**

सुचना आहे.

**गिता जैन :-**

किती आहे.

**गणेश पाटील :-**

आता आपल्याकडे तीन सुचना आलेल्या आहेत. पेणकरपाड्याचे आहे, भाईंदर (प.) धक्क्याचे आहे आणि उत्तनचे आहे.

**गिता जैन :-**

एक ग्रीनहाउसला किती खर्च बसतो?

**गणेश पाटील :-**

एक ग्रीनहाउसला एका छत्र्यानुसार, एरियावाईझ बसेल.

**मा. सभापती सो. :-**

खर्च एरियावाईझ बसणार.

**गणेश पाटील :-**

त्यात अँगल, कपडा वगैरेचा सगळा खर्च येईल.

**गिता जैन :-**

इनका २० लाख रू. इनक्ल्युड हो जाएगा।

(सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांनी प्रकरण क्र. १९८ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**मा. सभापती सो. :-**

सदर ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १९८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरणाचे सन २००६-०७ चे सुधारित व २००७-०८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. १९७ :-**

मा. अध्यक्ष, वृक्षप्राधिकरण समिती, मिरा भाईंदर महानगरपलिका यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात वाढ/घट करून रक्कम रू. ८३.०० लाख 'अ' अंदाजपत्रकातुन हस्तांतरण करण्यास आजची सभा एकमताने मंजुरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

| तपशिल | २००६/०७ | २००७/०८ |
|---|---|---|
| एकूण जमा | १६४.३७ | १४४.२५ |
| 'अ' अंदाजपत्रकातुन हस्तांतरण | ३१.७० | ८३.०० |
| एकूण खर्च | १९६.०७ | २२७.२५ |

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. हंसुकुमार पांडे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १९९ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

परिवहनचे बजेट बाकी आहे. पान नं. २ 'अ' अंदाजपत्रक हस्तांतर साडे ३ कोटी ६० लाख रू.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला सुद्धा त्यांना निधी द्यायचा आहे. जो आपल्याशी इफेक्ट आहे.

**शशिकांत भोईर :-**

त्यांच्यासुद्धा चुका असतील ना.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपल्याला विनंती करतो की, परिवहन विभाग सध्या कशा पद्धतीने चालतो आणि चालू आहे याचा जरा मला खुलासा करावा. मागील दोन महिन्यात वर्षाभराचे सांगितले तरी चालेल पण मागिल दोन महिन्याच्या काळी आपल्याला किती नुकसान झालेले आहे. किती तुट झालेले आहे ते तुम्ही सांगितले पाहिजे.

**मा. उपायुक्त सो. (श्री. अजिज शेख) :-**

आपण मागच्या वर्षी १५ सप्टेंबरला जो परिवहन विभाग चालू केला होता. तर त्यामध्ये आपण सध्या ४० बसेस चालवत आहोत आणि आपण अजून प्रॉफीटमध्ये गेलेले नाही. आपल्याला साधारणतः सहा सात महिन्यापुर्वी पर्यंत ११ लाख रू. १२ लाख रू. १३ लाख रू. अशा पद्धतीचे नुकसान होत होती.

**जयंत पाटील :-**

महिन्याला नुकसान होत होते?

**मा. उपायुक्त सो. (श्री. अजिज शेख) :-**

महिन्याला नुकसान होत होते. आपण ते बरेच कमी करत आणलेले आहे आणि मागच्य महिन्यामध्ये आपण ते आधीच ३ लाख रू. पर्यंत तुट आणलेली होती.

**रतन पाटील :-**

कुठली? डिसेंबर जानेवारी या महिन्याची तुट आणली होती?

**मा. उपायुक्त सो. (श्री. अजिज शेख) :-**

होय. डिसेंबर जानेवारी या महिन्याची तूट आणलेली आहे.

**रतन पाटील :-**

आपण डिसेंबर जानेवारी महिन्यात अडीच लाखापर्यंत तुट आणलेली आहे.

**मा. उपायुक्त सो. (श्री. अजिज शेख) :-**

होय आपण अडीच लाख रू. पर्यंत तुट आणलेली आहे.

**रतन पाटील :-**

म्हणजे याचा अर्थ असा की, तुम्हाला महिन्याला दोन अडीच लाख रू. पर्यंत तुट आहे. तर १२ महिन्याचे किती तर २४ लाख रू. तर मग तेवढीच घ्या ना. तुम्हाला कशाला जास्त पाहिजे? जर आपण महिन्याची तुट काढतात तर तेवढी घ्या हे महापालिकेचे कशाला ३ कोटी रू.............

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एखाद्या महिन्यावर होत नाही.

**रतन पाटील :-**

साहेब आम्हाला जरा बोलू द्या. तुम्हाला काय पाहिजे ते आम्ही तुम्हाला देतो.

**जयंत पाटील :-**

तुट कमी केली पाहिजे. त्याचा फायदा होईल.

**रतन पाटील :-**

तुम्ही जे खर्च आणले आहे. तुम्ही खर्च किती काढलेला आहे तो खर्चसुद्धा मी काढतो ते फालतू कशाला ठेवले आहे?

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेबांना माझी विनंती आहे की, सन्मा. सदस्य रतन पाटील साहेबांनी ज्या सुचना मांडलेल्या आहेत........

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, श्री. शेख साहेबांच्या ज्या सुचना आहेत. त्यामध्ये मी थोडे ॲड करतो पावसाळ्याचे किंवा शाळा सुरू होण्यापुर्वीचे परिवहनचे जे उत्पन्न असते ते डिफिसिट असते. आणि ज्यावेळेस ॲक्च्युअल शाळा सुरू होतात. त्यावेळेस जास्तीचे उत्पन्न असते. आता मार्च महिन्यानंतर परत शाळा संपत येईल. त्यावेळी ते उत्पन्न कमी होणार. तर त्यावेळेस त्यांना आपल्याकडून मदत घ्यावीच लागेल. मार्च ते जूनपर्यंत नुसते महिन्याला अडीच लाख रू. झाले आणि अडीच लाख रू. चे जे कॅल्क्युलेशन केले तर तसे होणार नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, मी तुम्हाला तेसुद्धा सांगतो. तुम्ही ह्यामध्ये विद्यार्थी पासेस दाखवले आहे. विद्यार्थी पासेस काय दाखवले आहे? किती दाखवले आहे? प्रवासी भाडे आणि विद्यार्थी पासेस काय दाखवले नाही?

**शशिकांत भोईर :-**

प्रवासी भाडे आणि विद्यार्थी पासेस ३ लाख रू. आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, मी असे म्हणत नाही की, महापालिका आपण परिवहन सेवा चालवतोय. त्याच्यामध्ये किती खर्च व्हायला पाहिजे आणि महापालिकेचे उत्पन्न, परिवहन उत्पन्न काय? आणि तुम्ही जनतेच्या डोक्यावर कर्जाचा बोजा किती लादतात आहात, त्या सगळ्याचा तुम्ही विचार करा. आता ॲग्रीमेन्टमध्ये काय आहे? जर डिझेलचे भाव वाढले तर तुम्ही त्यांना वाढवून देता. जर डीझेलचे भाव कमी झाले तर तुम्ही त्यांच्याकडून कमी करायला पाहिजे. पण तसेही नाही. असेसुद्धा होत नाही.

**मा. उपायुक्त सो. (श्री. अजिज शेख) :-**

तुमचा काहीतरी गैरसमज होतोय. आपण आपल्या ॲग्रीमेंटमध्ये तशी तरतुद केलेली आहे. की, डिझेलचे जे भाववाढ होईल किंवा कमी होतील जे काय व्हेरीएशन होईल तो इफेक्ट आपण त्यांना द्यायचा आहे आणि आपण त्या पद्धतीने करतो जर डिझेलचे भाव कमी झाले तर आपण त्यांना कमी देतो. जर डिझेलचे भाव वाढले तर आपल्याला त्यांना वाढीव दर द्यावा लागतो.

**रतन पाटील :-**

बोरिवली आणि ठाणे यासाठी आम्ही गेल्या दोन वर्षापासून हेच ऐकतो की आपल्याला बोरीवली आणि ठाणे हा महत्वाचा रूट चालू करायचा आहे. पण आतापर्यंत ह्या समितीने काय प्रयत्न केले आणि कुठे अडकले ते तरी सांगा का होत नाही?

**मा. उपायुक्त सो. (श्री. अजिज शेख) :-**

आपल्याला बोरीवली रूट पाहिजे ठाणे रूट पाहिजे. कारण ते प्राफिट मेकींग रूट असणार आहे आणि त्याठिकाणी नागरीकांची प्रवाशांची गरज सुद्धा आहे. त्यासाठी परिवहन समितीच्या मार्फत प्रचंड प्रमाणामध्ये प्रयत्न करण्यात आलेले आहे सगळ्या शेड वरती प्रयत्न करण्यात आलेले आहे.

**रतन पाटील :-**

त्यावर पाठपुरावा केला नाही. साहेब, दोन वर्षे झाली.

**मा. उपायुक्त सो. (श्री. अजिज शेख) :-**

भरपूर पाठपूरावा झालेला आहे. पाठपुरावा झाला नाही. असे नाही. प्रचंड पाठपुरावा झालेला आहे. इव्हन आम्ही मनापासून त्यासाठी प्रयत्न करत आहे. सगळी परिवहन समिती मा. आयुक्त साहेब आम्ही स्वतः सतत प्रयत्न करत आहोत.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, त्यासाठी मी स्वतः गेलो होतो. तो प्रयत्नशील झालेला आहे की प्रयत्न कुठे अटकलेला आहे? त्या बसेस तुमच्या स्वतःचे नाहीत. त्या बसेस भाड्याचे असल्यामुळे ते लवकर आपल्याकडे वर्ग करत नाही. तिथे हा मोठा प्रश्न आहे.

**मा. आयुक्त सो. :-**

भाडेच्या बसेस सुरू करण्यासाठी आपल्याला शासनानेच परवानगी दिलेली आहे.

**रतन पाटील :-**

इथे भाड्याच्या बसेसचा प्रश्न नाही.

**मा. आयुक्त सो. :-**

पण येथे सोयरी करत नाही. त्याच्यामध्ये महत्वाचा मुद्दा असा आहे की, ठाणे आणि बोरिवलीचा जो रूट आहे. त्या रूटसाठी आपण जवळजवळ दोन वर्षापासून सन्मा. सदस्य रतन पाटील जे सांगतात. त्याप्रमाणे, आपण दोन वर्षापासून प्रयत्न करत आहोत. प्रत्येक वेळेला आरटीओ ची जी बैठक होते. त्या आरटीओ च्या बैठकीमध्ये आग्रहाने आपण सांगतो की, आम्हाला हे दोन्ही रूटस चालू करायला परवानगी द्या. जेव्हा मुंबईच्या महानगरपालिकेने बी.एस.टी मिरा भाईंदरच्या हद्दीपर्यंत आणली किंवा मिरा भाईंदरमध्ये त्यांनी सेवा पुरवली तेव्हा त्यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेची एन.ओ.सी. घेतलेली नाही. परंतु, मिरा भाईंदरची सेवा त्यांच्या हद्दीपर्यंत जाण्यासाठी त्यांची एन.ओ.सी. लागते ते कशासाठी? त्याबाबती मध्ये आपण दोन वर्षापासून जरी प्रयत्न करीत असलो तरी, अजुनपर्यंत त्याच्यामध्ये आपल्याला यश येत नाही. तर आपण यासाठी कुठेतरी गांभिर्याने विचार करायला पाहिजे की, ठाण्याच्या बसेस ठाण्याच्या हद्दीपर्यंत थांबवा, बोरिवलीच्या बी.एस.टी. च्या बसेस बी.एस.टी च्या हद्दीपर्यंत थांबवा. तिथून आपण आपली सेवा देऊ या. आपण ह्याचा सुद्धा गांभीर्याने विचार केला पाहिजे.

**जेन्वी अल्मेडा :-**

आपण आपल्या हद्दीत त्यांना प्रवेश द्यायचा नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, बरोबर आहे. आम्ही तुमच्या या मताशी पूर्ण सहमत असू. कारण मिरा. भाईंदरच्या परिवहन सेवेचा आपण जे लक्ष गाठत आहात, त्याच्यासाठी आम्ही तुमच्या जोडीला आहोत. आणि आम्ही मागे आहोत. पण, ह्यासाठी आपण जे मागील दोन वर्षापासून प्रयत्न करत आहात. पण, त्याचा पाठपुरावा केला गेला नाही.

**मा. आयुक्त सो. :-**

आम्ही पाठपुरावा केला. आणि आपण जर असे म्हणत असाल...

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही ह्यांना घेऊन जा.

**रतन पाटील :-**

मी गेलो आहे. आम्ही ठाण्याला गेलो आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही आयुक्त म्हणून बोलतात. तुम्ही हे कशावरून हे बोलता की, ठाण्याच्या बसेस थांबवा म्हणून. तुम्हाला बसचा इतिहास माहित आहे का?

**मा. आयुक्त सो. :-**

कुठल्या बसचा?

**रोहिदास पाटील :-**

ठाण्याच्या बसचा. तुम्ही आयुक्त म्हणून कसे बोलणार. बेस्टच्या बसेस किंवा ठाण्याच्या बसेस येऊन या नागरिकांची किती सोय केलेली आहे. कोणत्या ही बसची प्रवाशासाठी सोय करायची ही आज तुमची तेवढी क्षमता आहे का? नाही. तुम्ही एकमेव निर्णय करुच शकत नाही. एकतर त्या बेस्टची बस आली म्हणून जेमतेम माणूस बोरिवलीला पोहचू लागला. ह्याचे तुम्ही कौतुक करणार नाही का? त्यांचे मार्ग....

**जेन्वी अल्मेडा :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, आपण आता तयार आहोत ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

ह्यामध्ये मी आपल्याला एक मुद्दा ॲड करतो.

**रोहिदास पाटील :-**

पहिले मला बोलू द्या. मग, तुम्ही बोला. तुम्हाला या सभेतही धन्यवाद द्यावा लागेल की, बेस्टने इथे बस दिली. म्हणून अनेक नागरिकांना ती अनेक वर्षे नीट रितसर फंक्शन सोय मिळाली. त्याचबरोबर ठाणे महानगरपालिकेनेसुद्धा इथे बस दिली म्हणून नागरिक ठाण्याला जावू लागले. कॉंग्रेस सरकारने एस.टी. दिली नाही.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, त्यावेळी बससेवा सुरू नव्हती.

**ग्रिटा फॅरो :-**

आता आपण सक्षम आहोत ना.

**रतन पाटील :-**

लोकांची सोय झाली की नाही.

**शशिकांत भोईर :-**

पक्षाकडे येऊ नका.

**मा. सभापती सो. :-**

पक्षाकडे येऊ नका.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

ही पक्षलेव्हलची बाब नाही.

**जयंत पाटील :-**

ही मा. स्थायी समितीची मिटींग आहे. मा. महासभेची मिटींग नाही. ज्यावेळेचे सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) बोलत आहेत ना. त्यावेळेला बससेवा सुरू नव्हती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

मला तेच म्हणायचे होते. याबाबतीत सन्मा. पालकमंत्र्यांनी दोन ते तीन बैठका घेतल्या. सचिव महोदयाच्या स्तरावरच्या बैठका झाल्या आणि आरटीओचे जे धोरण आहे. २० किलोमीटरच्या आत प्रत्येक स्थानिक स्वराज्याचे कनसेप्ट घेऊन त्या रुट चालवाव्यात. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी नमुद केल्याप्रमाणे बेस्ट आणि राज्यशासन परिवहन आणि ठाणे परिवहन हे गेल्या अनेक दिवसापासून हे रुट चालवतात. आणि त्यांचा विकास स्ट्रक्चर त्यांनी त्यासाठी तयार केलेला आहे. आज ते आपल्याला सहजासहजी रुट द्यायला तयार नाहीत. शासनाने यात धोरणात्मक निर्णय घेतलेले आहे. आणि त्याप्रमाणे आपण बेस्ट आणि ठाणे परिवहनाकडे प्रस्ताव पाठवलेला आहे. तर अजून आपल्याला एन.ओ.सी. मिळत नाही. ही वस्तूस्थिती आहे.

**तूळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही आमची बस मुंबईमध्ये चालू करा.

**मा. सभापती सो. :-**

पुढचा विषय घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

आपण गेल्या वर्षी २ कोटी रु. दिलेले आहेत.

**रतन पाटील :-**

पण २ कोटी रु. कशाला लागणार आहे, त्याचा खर्च काढला पाहिजे. साहेब, आमचा प्रशिक्षणाचा जेवढा खर्च कापू शकता तर तेवढा परिवहनाचा खर्च कापू शकता की नाही. आपण का बोलू शकत नाही?

**मा. सभापती साो. :-**

ही जनतेची सेवा आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, जनतेची सेवा आहे ते बरोबर आहे. पण तुमच्यामध्ये जे नॉनस्टॉप आहे. ते कमी करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, सन्मा. सदस्य रतन पाटील जे स्टेटमेंट बोलत आहेत ते प्रोसिंडीगमध्ये घ्या. आपल्या त्यांची सेवा घ्यायची नाही. सेवा केंद्र करायची आहे. त्यांची आपल्याला त्यांची सेवा बंद करायची आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, नागरिकांकडून पैसे आपण तोटयामध्ये जात आहोत. मग ते कमी करा ना. त्याच्यावरसुद्धा धोरण ठरवले पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

कोणतीही परिवहन सेवा फायद्यामध्ये नाही. त्यांना पैसे द्यावेच लागणार आहे.

**रतन पाटील :-**

व्यवस्थापक कोण आहेत, ते आम्हाला दाखवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

व्यवस्थापक मा. आयुक्त साहेब आहेत. आपण असे बोलू शकत नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, पान नं. ६ वर बघा. वाहन खरेदी आणि २ नं. मध्ये...

**मा. सभापती साो. :-**

साडेतीन मंजूर.

**शशिकांत भोईर :-**

साहेब मंजूर देण्याअगोदर ह्यावर चर्चा झाली पाहिजे. तुम्ही मंजूर करु नका. आम्ही विरोध करत नाही. अभ्यास करायला पाहिजे की, कुठे चुकले आहे. कुठे-कुठे तुम्ही रिक्षासारखे धावत आहेत. तुमचे ह्यावर नियंत्रण आहे का? तुम्ही त्यांना तूट देता, त्यांना 'अ' अंदाजपत्रकातून ३ कोटी रु., ५० लाख रु. हस्तांतर करता त्यावेळेस बस, रिक्षा एकामागून एक धावतात. त्याच्यावर तुमचे नियंत्रण आहे का?

**मा. सभापती साो. :-**

ते नवीन आहे.

**शशिकांत भोईर :-**

पण त्याच्यावर नियंत्रण कधी आणणार?

**रतन पाटील :-**

.आपले जे व्यवस्थापक आहेत. त्यांचा मुद्दा काय आहे? त्यांनी परिवहन समितीचे १ कोटी ५० लाख रु. मागितलेले आहे. मा. परिवहन व्यवस्थापकाचा अंदाज काय आहे, त्यांनी काही दिला नाही का? म्हणजे त्यांना द्यायचा नाही का? पान नं. ६ वर मा. परिवहन समितीचे अंदाज दिड कोटी रु. आहेत. तुम्ही दिले नाही.

**शशिकांत भोईर :-**

कर्ज उभारणीचे आहे.

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख साो.) :-**

सांगतो. आपण नवीन बस, सध्या कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने चालवत आहोत. आपली पॉलिसी नवीन बस खरेदीच्या संदर्भात कोणतीही ठरलेली नव्हती. ती परिवहन समितीमध्ये ठरली. परिवहन समितीमध्ये त्याबाबत चर्चा झाली. त्याच्याअगोदर आपल्याकडे कोणताही आराखडा नव्हता. आणि त्यामुळे त्या ठिकाणी परिवहन समितीमध्ये विचारविनिमय करुन त्याप्रमाणे, तरतुद त्याच्यावरती ठरवण्यात आलेली आहे.

**रतन पाटील :-**

आपण त्या सभेला होतात का?

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख साो.) :-**

होय त्या सभेला होतो.

**रतन पाटील :-**

आपल्यासमोर सभा झाली आहे. मग, आपण ह्यांना मान्यता दिली आहे म्हणून असे समजायचे का? आपण इथे काहीही हेड दिला नाही. फक्त परिवहन समितीचा हेड दिलेला आहे. तो आपण मान्य करायचा का? आज ५ कोटी रु. दिले आहे. आज ते ५ कोटी रु. आम्ही द्यायचे का?

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सो.) :-**

परिवहन व्यवस्थापक परिवहन समितीला बजेट देतात. त्या बजेटमध्ये नवीन बसेस खरेदीचा म्हणजे, स्वतःच्या मालकीचा बसेस खरेदीचा कोणताही प्रस्ताव परिवहन व्यवस्थापकानी दिलेला नव्हता. कारण तशी पॉलिसी कुठे ठरलेली नव्हती.

**रतन पाटील :-**

साहेब, मग ते सांगा.

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सो.) :-**

ती पॉलिसी आपल्या परिवहन समितीमध्ये ठरली म्हणून परिवहन समिती तरतुद करु शकत नाही का? त्यांना जर त्यांची पॉलिसी राबवायची असेल...

**रतन पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी दिलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ऐकून घ्या. मा. आयुक्त साहेबांनी बजेटमध्ये अंदाज दिलेले आहेत. तुम्ही मा. स्थायी समितीमध्ये सुचवले की नाही? तसेच, हे तुम्हाला अंदाजपत्रक दिलेले आहेत. त्यामध्ये तुम्ही काही सुचना करा.

**रतन पाटील :-**

त्यांनी ह्यांचे अंदाज दिले आहेत ना. त्यांनी द्यायला पाहिजे होते. साहेब, आपण त्यांना बाकीच्यामध्ये अंदाज दिले होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण शांतपणे विचार करा. परिवहन समितीने हे अंदाजपत्रक सादर केले. त्याच्यामध्ये मा. आयुक्त साहेबांनी सुद्धा पहिजे दिले. मग. मा. आयुक्त साहेबांच्या अंदाजपत्रकावरती परिवहन समितीने निर्णय घेतला की, आपल्या स्वतःच्या बस पाहिजे होत्या. बरोबर आहे मग हे अंदाजपत्रक तुमच्याकडे मंजूरीला आलेले आहे. त्याच्यावर तुम्ही डिसीजन घ्या. परत हे अंदाजपत्रक मा. महासभेमध्ये न्या. म्हणजे मा. महासभा डिसीजन घेईल.

**शशिकांत भोईर :-**

क्रमांकामध्ये बदल केला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

साहेब, आपण आता बस खरेदी करतोय. ही बस आपली असणार बरोबर आहे? मग आपण कॉन्ट्रक्ट रद्द करणार आहोत का?

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सो.) :-**

नाही.

**शशिकांत भोईर :-**

५ वर्षासाठी ठेवा ना.

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सो.) :-**

आपण कॉन्ट्रक्ट रद्द करणार नाही.

**जयंत पाटील :-**

कॉन्ट्रक्ट रद्द करणार नाही. आपली बससेवा चालू होईल. त्यांची बससेवा चाजू होईल. तर ते कसे काय होणार?

**हंसूकूमार पांडे :-**

मग आपला लॉस वाढणार.

**जयंत पाटील :-**

साहेब, त्यामध्ये तुम्ही कसे देखरेख करणार?

**रोहिदास पाटील :-**

साहेब, एकतर तुम्हाला परवानगी मिळाली नाही. तुम्ही बाहेर जाणार नाही. आता तुम्ही रूट कुठे चालवायचा तर ते तुमच्याकडे रूट नाही ह्या रूटवर आपण बससेवा चालू करू असा तुमच्याकडे आता रुट नाही. तुम्ही आताच्या ज्या ४ गाडया चालवतात. त्यातल्या तुमच्या दहा गाडया अजून चालू व्हायचे आहे. ह्या बसेस चालवण्यासाठी रूटच नाही. तुम्ही आणखी ३ गाडया खरेदी करता. खरेदी केलेल्या गाडया नुसती गाडी खरेदी करणे नाही. मग त्याचा मेन्टेनस त्याच्यात येतो हे सगळे त्यामध्ये आहे का? आम्हाला सांगा. तुम्ही सरळ सांगितले तुम्हाला मा. परिवहन समितीने सांगितले तुम्ही आमच्यासमोर सागितले तुम्ही आमच्यासमोर ते आणले. तुम्ही आम्हाला सविस्तर सांगा.

**जयंत पाटील :-**

आपण बससेवा केव्हा चालू करणार आहे?

**रोहिदास पाटील :-**

साहेब, गाडी खरेदी करणे हा एवढाच खर्च आहे का?

**तूळशीदास म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, हा विषय मिटींगमध्ये येणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

कधी येणार आहे?

**तूळशीदास म्हात्रे :-**

अगोदर बजेटमध्ये तरतूद करा.

**रोहिदास पाटील :-**

मिटींगमध्ये, स्टॅण्डींगमध्ये आम्ही नावे सांगायचे.

**शशिकांत भोईर :-**

आपला इकडे झालाच नसता. मा. स्थायी सभेत मंजूरी अंदाजपत्रकात किती द्यायचे आहे. आपण सविस्तर एक-एक विषयावर बोलायला पाहिजे. नुसते हस्तांतरावर बोलून फायदा नाही. प्रत्येक विषयावर एवढा खर्च का होतो. कमी करा. आपण कमी करण्याचा ठराव करू शकत नाही का?

**जयंत पाटील :-**

ते रद्दच होईल. कारण ती आपली बससेवा नाहीच.

**मा. सभापती सो. :-**

रद्द करा.

**जयंत पाटील :-**

जेव्हा आपली बससेवा होईल तेव्हा आपल्याला मंजूर आहे. ते आपल्या समोर आणा.

**मा. सभापती सो. :-**

आता चर्चा नको. रद्द करा.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, खर्चावरसुध्दा नियंत्रण करावे लागेल.

**मा. सभापती सो. :-**

खरेदी करायची नाही.

**जेन्वी अल्मेडा :-**

मा. महासभा निर्णय घेईल ना.

**रोहिदास पाटील :-**

फायदा काढा. आम्ही ते देऊ ना. आमची तयारी आहे.

**रतन पाटील :-**

आपल्या शहरामध्ये जेव्हा होईल तेव्हा आम्ही तयार आहोत. आपण त्यांना कुठल्याही हेडमध्ये काढून देऊ.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, त्यांना तीन कोटी ५० लाख रु. द्यायचे नाही. एका मागून एक रिक्षा सारखे गाडया जातात. मग, त्यांना तुम्हाला स्टॅण्डवर प्रवासी तर पाहिजे ना. स्टॅण्डवर त्याच्यामागे दोन रिक्षा सारख्या बस धावतात. फक्त एवढेच की, ठेकेदाराला बस किलोमीटर प्रमाणे त्याचे पैसे मिळतात.

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सो. ) :-**

साहेब, १२ लाख रु., १३ लाख रु. चे जे नुकसान होतात. ते आपण दोन ते अडीच तीन लाख रु. पर्यंत आणलेले आहे. कवर केलेले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती सो. :-**

सध्या त्यांची गरजच आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब आपण...

**शशिकांत भोईर :-**

हस्तांतरचे कशाला बिल द्यायचे द्यायचेच नाही.

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सो.) :-**

रोड जे हस्तातंरण आहे. हे करायला पाहिजेच ना.

**शशिकांत भोईर :-**

का करावे? त्यांनी नियंत्रण करावे ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण मागच्या वर्षी दोन कोटी रु. दिले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, असे आहे की....

**रोहिदास पाटील :-**

लॉस कमी करतात तर हस्तांतर आहे तेही कमी करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

मी सन्मा. सभागृहाला सांगू इच्छितो की, जे दिड कोटी रु. होते. जे आपण देणार ते करमणूकीकडून घेणार होते. जरी तो कमी केला तरी आपल्याला हे हस्तांतरण द्यावेच लागेल ना. डेप्युटी ऑपरेशनसाठीचा हस्तांतर आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही हस्तांतरमध्ये १३ लाख रु. ऐवजी अडीच लाख रु. ठेवणार आहात बरोबर आहे. तुम्हीच दावा करतात की, प्रॉपर्टी चालणार आहे. मग, हे साडे तीन कोटी रु. आहेत. त्याच्याऐवजी कमी करुन द्या. आम्ही अजिबात देणार नाही असे म्हणत नाही. हे उरले आहे ते खोडून टाका असे म्हणत नाही.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, परिवहन तीन कोटी रु. चे अंदाज आहेत आणि परिवहन समिती म्हणते की, साडेतीन कोटी रु. चे आहेत.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य तूळशीदास म्हात्रे साहेब, आम्ही विरोध करत नाही. तुम्ही बस चालू करा, मी कुठे नाही म्हणत नाही. त्यांना तेवढे पैसे लागणार नाही. ते अन्य कामामध्ये पैसे कमी करतात.

**शरद बेलवटे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलत आहे. मा. परिवहन समितीला जे प्रशासनाचे बजेट सादर करण्यात आले होते. आमच्याकडे कुठल्याही नवीन बसेस खरेदी करण्याचा प्रस्ताव नव्हता. परेंतु, मा. परिवहन समितीला सादर केल्यानंतर आपली सध्या जी बससेवा ठेकेदाराकडून चालू आहे त्यांची मक्तेदारी किंवा मोनोपॉली होईल किंवा त्यांच्या अचानक बसेस बंद केल्या. तर आपल्याला पर्याय व्यवसाय म्हणून स्वतःचा ह्यामधून नवीन कर्जरुपाने कमिटी प्रोव्हिजन केलेली आहे. आता ते डिसीजन तुम्ही घ्यायचे आहे.

**जयंत पाटील :-**

अचानक बंद झाल्यानंतर बससेवा रद्द कशा करणार?

**हंसुकूमार पांडे :-**

साहेब आपण ॲग्रीमेंट केले की नाही. कसे बंद करणार.

**एस. ए. खान :-**

आपल्याला बससेवा अचानक बंद करायची. आपण काही करु शकत नाही असे झाले.

**जयंत पाटील :-**

ॲग्रीमेंट करु शकत नाही.

**हंसुकूमार पांडे :-**

काल तो बोलेल की आम्हाला २१ रु. भाव द्या.

**एस. ए. खान :-**

आमचा अधिकार नाही का?

**शरद बेलवटे :-**

साहेब हे प्रशासनाचे निवेदन आहे हे परिवहन समितीचे निवेदन आहे.

**हंसुकूमार पांडे :-**

अचानक बंद करणार म्हणून निवेदन आहे का?

**गीता जैन :-**

मा. सभापती साहेब, आपल्याला ते पटले नाही तर आपण ते कॅन्सल करु या.

**मा. सभापती साो. :-**

कॅन्सल करु या.

**शशिकांत भोईर :-**

जर परिवहन व्यवस्थापक हस्तांतराबाबत ३ कोटी रु. दाखवतात. आणि परिवहन समिती साडे तीन कोटी रु. बोलतात. ह्याच्यात आपण काटकसर करा. मा. स्थायी समितीत आपण गेल्या वेळी २ कोटी रु. दिले तर २ कोटी रु.च ठेवा. ३ कशाला पाहिजे.

**गीता जैन :-**

जून-जूलै गेल्यावर्षी पण आलेले होते. गेल्या वर्षी तुमचा २ कोटी रु. कोटा आहे. आता कोटा कशाला वाढणार?

**शशिकांत भोईर :-**

आपल्याला डिसेंबरपर्यंत लॉस ११ लाख रु. पर्यंत होता. आता २ लाख रु. वर आला आहे. मग, आणखी कमी करायला पाहिजे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पेट्रोलचे दर दरवर्षी वाढत आहेत.

**शशिकांत भोईर :-**

२ कोटी रु. करा.

**अजिज शेख (मा. उपायुक्त) :-**

आपण वर्षाला दिड कोटी प्रवाशांना कॅरी करतोय. म्हणजे, साधारणतः आपण जर प्रवासी धरले तर साधारणतः दोन रुपये पर्यंत आपण देतो.

**रोहिदास पाटील :-**

दिड कोटी रुपये द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

शहरामध्ये दिवाबत्ती, पाणी, रस्ते जेवढे महत्वाचे आहे तेवढेच परिवहन महत्वाचे आहे. तेसुध्दा कार्यक्षम पध्दतीने चालायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

आपण जेव्हा मागाल तेव्हा आम्ही सक्षम आहोत ना.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, पहले ११ लाख रु. लॉस था। अभी २ लाख रु. लॉस है। तो इसलिए अभी कम किजीए है ना।

**रतन पाटील :-**

या सभेमध्ये ............

**हंसुकुमार पांडे :-**

खर्च कमी करा.

**रोहिदास पाटील :-**

२ कोटी रु. ठेवा.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेबांनी ३ कोटी रु. सुचवले आहेत ना. तर ३ कोटी रुपयेच ठेवा ना.

**गीता जैन :-**

मा. सभापती साहब, अगर इनका दावा है की, यह लॉस कम कर रहे है तो आपको बढाके क्यों चाहिए।

**हंसुकुमार पांडे :-**

२ कोटी रु. ठेवा.

**गीता जैन :-**

आपका यह दावा है की, हम लॉस कम कर रहे है ......

**हंसुकुमार पांडे :-**

२ कोटी रुपये भरपूर आहेत.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, आपण २ कोटी रु. देतो तरीसुध्दा आपल्या उत्पन्नाचे स्त्रोत का येत नाही?

**रोहिदास पाटील :-**

मी मा. सभापती साहेबांना मान देतो. मा. आयुक्त साहेबांना मान देतो. दिड कोटी रु. चे दोन कोटी रु. देतो.

**शशिकांत भोईर :-**

दोन कोटी रुपये.

**हंसुकुमार पांडे :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, आता तुम्ही वाढवू नका.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब अडीचचे दोन देतो. २ लाख रु. बस झाले.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, २ कोटी रु. चे प्रस्ताव आहे.

(सभागृहात गोंधळ)

**गीता जैन :-**

हर साल वॅकेशन आता है और गये साल अगर आप इतना लॉस करते है तो आपको लॉस उससे कम होना चाहिए। आप उससे बढाके मॉंग रहे है। सन्मा. सदस्य रोहिदास पाटील पहले जो १.० फिगर बोले थे वह एक्झॅक्ट थे।

**रोहिदास पाटील :-**

आता आपण मान देत आहोत.

**हंसुकुमार पांडे :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, अभी २ कोटी रु. ही किजीए।

**शशिकांत भोईर :-**

२ कोटी रुपये.

**गीता जैन :-**

मा. सभापती साहेब, ढाई हो तो उसपर हमारा ऑब्जेक्शन है।

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, २ कोटी रुपयेच करा.

**जयंत पाटील :-**

आपण ठेकेदाराला पैसे द्यावेच का, हे आम्हाला कळत नाही.

**मा. सभापती :-**

उनको देंगे ही नही।

**शरद बेलवटे :-**

मा. सभापती साहेब, आपण जे आता अडीच कोटी रु. चे रुलिंग दिले आहे. तर ह्यामध्ये दिड कोटी रु. चे डेफिसिट आहे. त्या डेफिसिटमध्ये सन्मा. सदस्यांनी खर्चाचे कोणकोणते हेड कमी करावेत, ते मला सांगावे लागेल.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, २ कोटी रु. चे दिड कोटी रु. करा. त्यांनी अप्रत्यक्षपणे असेच सांगितले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. बेलवटे साहेब, दोन नंबर पानावरती जमा दिड आहे. तो तुम्ही कमी करा. वित्तीय संस्थाकडून कर्ज.

**एस. ए. खान :-**

तो जमा वेगळा आहे.

**शशिकांत भोईर :-**

तो जमा पल्स वेगळा आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

पैसा किधरसे आएगा?

**गीता जैन :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहब, दिड से दो पर आए ना।

**शशिकांत भोईर :-**

आपण स्वखुशीने देतो.

**रोहिदास पाटील :-**

वास्तविक दिड आहे. आपण वास्तविक दिडच्या ठिकाणी आपण दोन कोटी रु. दिले. आपण दोघांचेही नाव घेतले. मा. सभापती साहेबांचा मान ठेवतो, मा. आयुक्त साहेबांचा मान ठेवतो. आपण दिडच्या ठिकाणी दोन केले आणि हा निधी आपण कोणाच्या खिशातून देत नाही, कोणाला मदत करत नाही, कोणावर मेहरबानी करत नाही. त्या दिडमधून वास्तविक जे आहे. हे दोघे आहेत ते चिंतेत आहेत. आपल्याला वाटते की, आपले काम संपले. ह्यांना परत जोडून द्यावे लागेल. साहेब, जेवढे वाढवले आहे तेवढे कुठेतरी कमी करावे लागेल. आम्ही सकाळपासून वाढवत गेलो. तेथे तुम्ही कुठे वाढवले आहे? आता इथुनही तुम्ही साडे तीन कोटी रु. च्या ठिकाणी २ कोटी रु. केले. परत दिड कोटी रु. वाढवले.

**मा. सभापती :-**

अडीच करुन टाका.

**जेन्वी अल्मेडा :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, आपण येथे तीन दिवस झाले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही विरोध करत नाही.

**शशिकांत भोईर :-**

ह्याचे किती झाले?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अडीच कोटी रु. फायनल झाले. साहेब असे आहे की तीन दिवस...........

**जयंत पाटील :-**

आम्हाला चांगली कामे करायची आहेत. या शहरात आम्हाला हॉस्पीटल बनवायचे आहे.

**गीता जैन :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहब, आप कलसे कलवर्ट के लिए सोच रहे है और इसमे आप ५० लाख रु. बढा रहे है।

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आता समजा, आपल्याला हॉस्पीटल ऑर्डर आली आणि तेवढे पैसे भरायचे आहे. परेंतु, १ कोटी आपण ह्यांच्याकडे आपल्या तिजोरीतून मागणार आहोत का? आपल्याला ते पैसे तिकडेच कामाला येतील. साहेब, आपण ह्यांना आपल्याच बजेटमधून 'अ' अंदाजपत्रकातून त्यांना देतोय.

**मा. सभापती :-**

श्री. पाटील साहेब, विचारा ना. काय किती चालले आहे, काय नाही. आपल्याला कुठपर्यंत त्रास आहे, काय नाही.

**नगरसचिव :-**

आजचा अजेन्डा जो सकाळी वाचला होता. आपण त्यावर चर्चा केली. परत एकदा फक्त अजेन्डा वाचतो.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

ठराव वाचा.

**शशिकांत भोईर :-**

ठराव वाचण्यापूर्वी नगरसचिव साहेब मी पहिले पण काल आपल्याला बोललो होतो की, आपल्याला विभागवारे झाल्यानंतर हेड घ्यायचे आहे. मग, ते कधी घेणार? मग, आपण ठराव केला म्हणजे, जैसे थे आणि ह्यामध्ये आणखी त्रुटी होत्या. आम्ही त्या त्रुटी कधी निर्दशनास आणणार? आपण पाणी पुरवठ्याला साडे अकरा कोटी रु. दिलेले आहे. आपल्या 'अ' अंदाजपत्रकातून दिलेले आहे. म्हणजे सबसिडी सर्वांनाच देत जायची का? ही सबसिडीच झाली ना. इकडचा जमा तिकडे खर्च करायची. प्रत्यक्ष त्यामध्ये काल एक राहून गेले. आरोग्य विभागावर आपली जेव्हा चर्चा सुरु होती. तेव्हा त्यामध्ये १ जुलै पूर्वी त्यांना पर्यावरणाचा अहवाल द्यायचा होता. त्यांनी गेल्या वर्षी दिलाच नाही. का दिला नाही? कुठे दिला आहे?

**शशिकांत भोईर :-**

नगरसेवकांना पोचवला आहे का? आता दुसरे म्हणजे आपली एस.आय.बाबत चर्चा झाली होती. आपल्या महापालिकेच्या कर्मचाऱ्यामध्ये काही एस.आय. आहेत. आपण बाहेरचे घेण्यापैकी त्यांना ती रक्कम वाढवून दिली होती. आपण तिकडे ती कमी करु शकलो असतो. त्यावेळी मा. सभापती साहेब आपलीसुध्दा परवानगी घेतली होती की, आपण पुन्हा संपूर्ण भांडार विभाग की आपण प्रत्येक विभागाला बोलावले होते. त्यांच्याकडून सविस्तर माहिती घ्यायची होती.

**मा. सभापती :-**

बोलावले आहे ना.

**शशिकांत भोईर :-**

आपण घ्यायलाच नाही पाहिजे. अद्यापपर्यंत विभाग सुरु आहे.

**मा. सभापती :-**

तुमचे म्हणणे काय आहे की, परत उद्या मिटींग बोलवावी.

**शशिकांत भोईर :-**

होय. एक दिवस मिटींग घ्यायला हरकत नाही. आम्ही बसायला तयार आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब, आपण चर्चा केलेली आहे. आता परत घ्यायची गरज नाही.

**मा. सभापती :-**

शंका काय असेल तर बोला. आपण शंकेचे निरसन करुन घेऊ या.

**शरद बेलवटे :-**

या वर्षी अनुमोदन जे आहे ते एकेक क्लिअर कट करुन घ्या. गेल्या वर्षी ते कॅसेट वाजवा असे चालले होते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तसे होणार नाही. श्री. बेलवटे साहेब, इथे तीन दिवस चर्चा होते. हे इव्हिडन्स आहे. ह्यानंतर मा. महासभेतही चर्चा होणार आहे. ह्यामध्ये आक्षेप घेण्याचा कुठला प्रश्न नाही. तुम्ही तरी सही घ्या. तरीही असे होणार नाही.

**शशिकांत भोईर :-**

परिवहनचे काय झाले? सन्मा. सदस्य परिवहनाचे काय झाले?

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. १९९ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १९९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००६-०७ चे सुधारित व २००७-०८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. १९८ :-**

मा. परिवहन सभापती, मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम यांनी सादर केलेले सन २००६-०७ चे सुधारीत व सन २००७-०८ च्या मुळ अंदाज पत्रकास कार्यालयीन विवरण पत्रे, अहवाल तसेच प्रत्येक विभागांची तपशिलवार माहिती विचारात घेवून मा. परिवहन सभापतीचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ/घट आणि त्यानुसार विभागण्यात आलेला बाबवार खर्च विचारात घेवून सन २००७-०८ या वित्तिय वर्षात रक्कम रू. ४.०० लाख इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा एकमताने मंजुरी देत आहे. अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करित आहोत.

| तपशिल | २००६/०७ | २००७/०८ |
|---|---|---|
| ''महसुली''+''भांडवली''+''असाधारण'' एकूण जमा | ९५५.९९ | १५२७.०० |
| ''महसुली''+''भांडवली''+''असाधारण'' एकूण खर्च | ९५५.९९ | १५२३.०० |
| अखेरची शिल्लक | | ४.०० |

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील. अनुमोदन :- श्री. एस.ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. २०० चे वाचन केले.)

**रोहिदास पाटील :-**

आपले दोन विषय राहिले आहेत. एक अंदाजपत्रक मी सकाळपासून सांगत आहे. मा. सभापती साहेब, हे धोबीघाटचे कुठे प्रोव्हिजन केले आहे? ते सीटी इंजिनियर सांगितले का? कुठे प्रोव्हिजन केले आहे?

**दिपक खांबित :-**

केलेले आहे. ते कागद पहा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

धोबीघाटची गरज काय आहे?

**रोहिदास पाटील :-**

साहेब, दुसरे म्हणजे चौपाटीची तरतुद तुम्ही फक्त १ लाख रु. लिहलेले आहे. त्याचे काय? अनधिकृत की अधिकृत ते आपले अपत्य आहे. आता ते तुम्ही अपत्ये जन्माला घातले तर त्यांची निगा राखायला पाहिजे. त्याला कुठेतरी वाढवावे लागेल. असे नाही की नुसती जागेवरुन कोटी रुपये खर्च करणे हा विषय वेगळा आहे. १ कोटी रु. नसतील तर तेथे ७५ लाख रु. ठेवायला पाहिजे. तुम्ही जे वापरु शकत नसाल तर त्याला बेकायदेशीर कोण वापरणारनाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जागा नुसती वाढवून सुध्दा काय मतलब नाही.

**रोहिदास पाटील :-**

जागा ताब्यात घेणे, वापरणे, वाढवणे हा विषय वेगळा आहे. पण आपण जे केलेले आहे. त्याची देखभाल, दुरुस्ती सगळेच आहे की नाही. मग आज एकच जागा .........

**मा. आयुक्त :-**

त्याचा बांधकाम विभागाने विचार केला असेल ना.

**रोहिदास पाटील :-**

होय. त्याला हेड ठेवा. साहेब, तुम्ही बेकायदेशीर वापरा असे मी बिलकुल शब्द वापरणार नाही.

**मा. आयुक्त :-**

त्याला तुम्ही ऑफिशियली हेड करुन द्या.

**रोहिदास पाटील :-**

आपण चौपाटी देखभाल करु शकतो. आपण चौपाटी केली ना. त्याला कोणतीही तांत्रिक अडचण येणार नाही. मी महापालिकेला तांत्रिक अडचणीतून बाहेर काढणार. म्हणून मी बोलत आहे. ज्यावेळी कोणीतरी तांत्रिक अडचण करुन ते अडचणीत आणले होते. त्यावेळी तुम्ही बाहेर काढलेले आहे. त्यामुळे ह्यामध्ये तुम्ही चुकीचा सल्ला देण्याचा प्रयत्न करणार नाही. मला त्यांची लालच सुध्दा नाही. पण त्याने जे हे सगळे केले त्यासाठी सामोरे जाण्याची तरतुद तर केले पाहिजे.

**दिपक खांबित :-**

धक्का करायचा आहे.

**रोहिदास पाटील :-**

धक्का करायचा वगैरे तो विषय वेगळा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. खांबित साहेब, गेल्या वेळी किती प्रोव्हिजन केली होती?

**रोहिदास पाटील :-**

पुष्कळ. १ कोटी रु. होती. ते १ कोटी रु. वाचत आहे. दुपारी माझ्या लक्षात आले की, १ लाख रु. आहे. साहेब तापर्यंत माझ्या लक्षातही आले नव्हते. जे १ लाख रु. आहे तो आपण १ कोटी रु. समजू या का?

**दिपक खांबित :-**

साहेब, आपण चौपाटीवर सन २००३ ला ३० लाख रु. खर्च केले. सन २००४ ला १५ लाख खर्च केले. सन २००५ ला १८ लाख रु. खर्च केला होता. गेल्या वर्षी आपण काहीच खर्च केला नाही.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, त्याची तरतुद तर ठेवायला पाहिजे. तुम्ही बेकायदेशीर खर्च करा असा कुठलाही शब्द वापरणार नाही.

**मा. सभापती :-**

१० लाख रु ठेवा.

**रोहिदास पाटील :-**

२५ लाख रु. ठेवा.

**मा. सभापती :-**

तुम्ही मला सांगितले की, १० लाख रु. ठेवा. १० लाख रु. बस झाले. २५ लाख रु. कशाला पाहिजे?

**रोहिदास पाटील :-**

मी तुम्हाला बेकायदेशीर कुठेही खर्च करायला सांगणार नाही. त्याची तरतुद ..........

**नगरसचिव :-**

भाईंदर पुर्व - पश्चिम चौपाटीसाठी १० लाख रु. ची तरतुद केलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

एक पूर्व - पश्चिम असेल तर २५ तरी करा.

**रोहिदास पाटील :-**

मग, पूर्वेमध्ये लिहा.

**मा. सभापती :-**

पूर्व - पश्चिम लिहायला लागेल. मिरा भाईंदर आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, खर्च करायचे नसेल तर तुम्हाला लिहायला काय हरकत आहे. तुम्ही २५ लिहून ठेवा ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नाही. तुमची अगोदरची कामे झालीच नाही. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, तुम्ही एकटे चौपाटीसाठी बोलतात आणि आम्ही कुठलेही सदस्य तुम्हाला विरोध करत नाही. तुम्ही बीजेपीचे फक्त दोघंजण असूनसुध्दा आम्ही सगळे तुम्हाला सहकार्य करतो. तुम्हाला आणखी .......

**मा. सभापती :-**

त्यांनी १० सांगितले आहे.

**रोहिदास पाटील :-**

हे शहर वाढत आहे. तुम्ही पाच-दहा लाख रु. ची तरतुद ठेवा ना. कुठेतरी व्यवस्था करा.

**जयंत पाटील :-**

मुंबई महापालिकेत कुठे धोबीघाट आहे?

**गीता जैन :-**

आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, जे जुन गाव होते. त्यावेळेस नदी राहायचे किंवा समुद्रकिनारा जवळचा ओढा रहायचा. पण आज या ठिकाणी ही फॅसिलिटी राहिली नाही. आपल्याकडे लॉजिंग बिजनेस असतो. घरांचे मुख्य व्यवसाय असतात. अशा धोरणाचा व्यवसाय करणारा खुप मोठा समाज आहे. आता त्यासाठी कॉमन धोबीघाट हे प्रत्यक्ष घाट होतात. पाण्यासारखे धोबीघाट आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब, आपण धोबीघाट किती बनवणार आहात?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तो विषय वेगळा आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, आवश्यक ती तरुतद करा. मी काही बोलत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही तुम्हाला विरोध करतच नाही. तुम्ही सांगा की, तुम्हाला किती हेड पाहिजे?

(सभागृहात गोंधळ)

**दिपक खांबित :-**

पान नं. २९ आहे ना. सार्वजनिक तळी आहे ना. सुशोभीकरण तिथे आपली धोबीघाट करा. मग झाले.

बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-

नैसर्गिक तलावाच्या ठिकाणी करता येत नाही. ते आपल्या हद्दीत आहे त्याला डिस्टर्ब करता येत नाही.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, ज्याठिकाणी योग्य आहे तो हेड ओपन करा. १७ चे १८ करा. काहीतरी करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही बांधकामाच्या कुठल्याही हेडमध्ये घेऊ शकता.

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे रिझर्व्हेशन आहे का?

**रोहिदास पाटील :-**

धोबीघाटसाठी तरतुद करा. कुठलेही अमाऊंट टाका

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

१० लाख रु. भांडवली, बांणकामात कुठेही ठेवणार आहे. जो हेड असतो तो भांडवलीमध्ये कुठेही टाका. ते ऑबलिक करुन सार्वजनिक बांधकाम ............

**ध्रुवकिशोर पाटील :-**

वाचायची सुध्दा गरज नाही. फक्त तिथे नाव लिहा.

**मा. सभापती :-**

५ करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नाव लिहले तरी तेथे उमाऊंट वाढवायची भांडवलीमध्ये टाका. आपली ॲसिस्ट राहिल. एखादा फ्लॅट वगैरे विकत घेऊन केले तरी चालेल.

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका 'अ' अ 'क' अ वृक्षप्राधिकरण अ परिवहन सन २००६-२००७ चे सुधारीत व सन २००७-०८ चे मुळ अंदाजपत्रक चर्चेत ठरल्याप्रमाणे मंजुर करण्यात आले आहे.

**प्रकरण क्र. २०० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००६-०७ चे सुधारित व २००७-०८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र १९९ :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले सन २००६/२००७ चे सुधारीत व सन २००७-०८ च्या मुळ अंदाजपत्रकास कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल तसेच प्रत्येक विभागांची माहिती घेवून मा. आयुक्तांचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ/घट आणि त्यानुसार विभागण्यात आलेला बाबवार खर्च विचारात घेवून सन २००७/२००८ या वित्तीय वर्षात रक्कम रू. ५.०० लाख इतक्या रक्कमेच्या शिल्ल्की अंदाजपत्रकास आजची सभा एकमताने मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपूढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

| तपशिल | २००६/०७ | २००७/०८ |
|---|---|---|
| अंदाजपत्रक ''अ''+''ब''+''क''+वृक्षप्रधिकरण एकूण जमा | २८०८६.७४ | ३२४१७.२० |
| अंदाजपत्रक ''अ''+''ब''+''क''+वृक्षप्रधिकरण एकूण खर्च | २७५५१.१६ | ३२४१२.२० |
| अखेरची शिल्लक | ५३५.५८ | ५.०० |

सुचक :- श्री. जयंत पाटील. अनुमोदन :- श्री. रोहिदास पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

सभा संपल्याचे वेळ :- सायं. ७.०० वा.

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका